
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 12 | AUGUST - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# शिवकालीन किल्ल्यांचे राजकिय व ऐतिहासिक महत्व

प्रा. डॉ. अनिल ठाकरे
इतिहास विभाग प्रमुख , श्री गाडगे महाराज महाविद्यालय,मुर्तीजापुर.

**प्रस्तावना :**



छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आधुनिक युगाप्रमाणे युध्दतंत्रात प्रगती झालेली नव्हती त्यावेळी लांब पल्ल्याच्या तोफा व क्षेपणास्त्रे नव्हती,प्रांतातील किल्ल्यांना विशिष्ट अशा त्यावेळच्या परिस्थितीमुळे महत्व आले होते. त्यामुळे प्रत्येक राज्यकर्ता आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अवघड जागी शत्रुपासुन सुरक्षित राहील अशा ठिकाणी सत्त केंद्रे निर्माण करत असे किल्ल्यांच्या माध्यमातुन आपले सुरक्षित सत्ताकेंद्र राज्यकर्त्यांकडून केले जाई. राजकिय दृष्टया किल्ल्यांना प्राचीन काळापासुन महत्व आहे. मनुस्मृतीमध्ये असा उल्लेख आहे की ''दुर्गाचा आश्रय केलेला एकच योध्दा बाहेरील शंभर मनुष्याशी व दुर्गावरील शंभर योध्दे बाहेरील दहा हजार योध्यांशी युध्द करु शकतात.'' संभाजी राजांनी लिहीलेल्या 'बुधभुषणम्' ग्रंथात दुर्गाचे महत्व विशद केले आहे. राजकिय अस्तित्व राखण्यासाठी दुर्गम किल्ले आवश्यक आहेत. शिवकाळातील परमानंद यांनी 'शिवभारत' या ग्रंथात म्हटले आहे.

एकंदर किल्ल्यांचे महत्व लक्षात घेवूनच शिवाजी राजांनी आपल्या जहागिरीतील,तोरणा, राजगड,सिंहगड, पुरंदर किल्ले जिंकुन स्वराज्याची स्थापना केली. नविन प्रदेश जिंकल्यावर तिथे किल्ल्यांच्या साखळया तयार करुन स्वराज्याचे रक्षण व विस्तार केला.

## १. घाट माथ्यावरील किल्ल्यांचे राजकिय महत्व :-

कोकण,घाटमाथा, मावळ व देश अशी सहयाद्रीमुळे महाराष्ट्राची नैसर्गिक विभागणी झाली आहे. कोकण व देश यांचे दरम्यान असलेल्या अनेक घाटावरुनच या प्रदेशाला घाटमाथा असे नांव मिळालेले आहे. याची लांबी सुमारे ३२० कि.मी. व रुंदी सुमारे ८० कि.मी. आहे. कोंडाणे,बेंडसे कार्ले भाजे या प्रसिध्द लेण्या याच भागात कोरलेल्या आहेत. कोरीव व लेण्याच्या प्रगत वास्तुशास्त्रामुळे डोंगरी किल्ल्यांच्या उभारणीला हातभार लागला. 'बुधभूषणम' या ग्रंथात गिरिदुर्गाचे महत्व सांगतांना म्हटले आहे की, ''सर्वात गिरिदुर्गच श्रेष्ठ आहे. त्याच्याच साहयाने धनवित्तांचे उत्तम प्रकारे संरक्षण करता येते. ज्या गडास उंच पर्वताची शिखरे आहेत व सभोवताली खडक किंवा कडे तुटलेले असुनही तटही आहेत तो गड उत्तम समजावा.

चालुक्य, राष्ट्रकुट,शिलहार, यादव या राज्यकर्त्यांनी या प्रदेशाचे राजकिय महत्व लक्षात घेवुन किल्ले बांधले उत्तरेकडून महाराष्ट्रावर जी काही आक्रमणे झाली ती रोखुन धरण्याचे काम नाशिक बागलान मधील किल्यांनी केले आइन .-ए- अकबरीत साल्हेर मुल्हेर किल्यांनी मोगलांच्या वेढयाला बारा वर्षापर्यंत दाद दिली नव्हती असा उल्लेख आहे. शिवकाळात देखील या प्रदेशातील किल्ल्यांचे राजकिय महत्व टिकुन होते. राजगड,रायगड, तोरणा, पुरंदर या किल्यावरुन शिवाजी राजांनी महत्वपुर्ण राजकिय उलथापालथी केल्या. राजगड व रायगड हे किल्ले राजधानीसाठी निवडले कोकणातुन देशावर

जाण्यासाठी उपयोगात असलेल्या घाटमार्गावर नियंत्रण ठेवण्याचे काम घाटमाथ्यावरील किल्ल्यांनी केले आहे.

## २. मावळातील किल्ल्यांचे राजकिय महत्व :-

पश्चिमेस घाटमाथ्यावरील सहयांद्रीच्या कुशीत असलेल्या पुर्वेकडील उतारावर काही नद्यांच्या खोऱ्यांना 'मावळ' प्रदेश म्हणतात. मावळ प्रदेशातील महत्वाची ठाणी व किल्ले राजकिय दृष्टया प्राचिन काळापासुन प्रसिध्द आहे.सातवाहन काळापासुन जुन्नर शहर व शहराच्या शेजारील शिवकाळातील शिवनेरी किल्ला राजकिय व व्यापारी दृष्टया प्रसिध्द आहे. लोहगड या किल्ल्यावरुन नाणे आणि आंदर मावळावर नजर ठेवण्यात येत असे तुंग व तिकोना या दोन गिरिदुर्गामुळे नियंत्रण ठेवता येई. सिंहगडावरुन मुसे, तर रोहिडयावरुन हिरडस, मावळ, रोहीडेखोरे या भागावर नियंत्रण राखता येत असे मावळ प्रदेशातील किल्ल्यांच्या आश्रयानेच शिवाजी महाराजांना स्वराज्याची स्थापना व स्वराज्य विस्तार करता आला.

## ३. देशावरील किल्ल्यांचे राजकिय महत्व :-

देशावर या विभागात अजिंठा, सातमाळा,हरिश्चंद्र बालाघाट इत्यादी डोंगरांची रांग आहे. उत्तरेकडुन होणारे आक्रमण रोखण्यासाठी या रांगेत धोपड, हातगड, देवगीरी, साल्हेर, मुल्हेर, चांदवड, अहिंवंतगड औढा, पट्टा रतनगड, वैराटगड, कमलगड, वसंतगड, भुषणगड हे किल्ले मध्ययुगात बांधले गेले. हे किल्ले आपल्याकडे असावे म्हणुन मोगल - मराठे यांच्यात अनेक वेळा, लष्करी संघर्ष झाला. मोगली प्रदेशातून मिळविलेली लूट स्वराज्यात सुरक्षित आणण्यासाठी शिवाजी राजांना नाशिक व बागलान या प्रांतातील किल्ल्यांचा अतिशय उपयोग झाला. स्वराज्याच्या सरहद्दीवरील किल्ले म्हणुनदेशावरीलकाही किल्ल्यांचा राज्यविस्तार करण्यासाठी व शत्रुला रोखण्यासाठी एक लष्करी तळ म्हणून शिवाजी राजांना उपयोग झाला.

## कोकणातील किल्ल्यांचे राजकिय महत्व :-

सहयांद्रीच्या पश्चिमेकडील अरबी समुद्रापर्यंतच्या प्रदेशाला कोकण प्रदेश म्हणुन ओळखतात राष्ट्रकुट काळापासुन सागरी मार्गाने व्यापार करण्याच्या निमित्ताने अरबांचा महाराष्ट्राशी संबंध आला त्यानंतर पोर्तुगीज, सिद्दी, फ्रेंच, इंग्रज इत्यादी परकिय सागरी सत्तांचे आगमन झाले या परकिय सत्तापासुन आपले राज्य सुरक्षित ठेवण्यासाठी मध्ययुगीन राज्यकर्त्यांनी कोकणात अनेक किल्ले बांधले. स्वराज्याचा उद्योग हाती घेतल्यानंतर शिवाजी राजांनी कोकण प्रदेश व कोकणातील किल्ल्यांकडे लक्ष दिले.

कोकणातील शिवाजी राजाचा प्रमुख शत्रु जंजिऱ्याचा सिद्दी होता. इ.स.१६६५ च्या पुरंदर तहान्वये शिवाजी राजांनी मोगलांना कोकाणातील प्रदेश किंवा किल्ले द्यावयाचे टाळले घाटमाथा व कोकणाकडे शाही राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष होते. त्याचा शिवाजी राजांनी फायदा घेवून तिथे आपला राज्यविस्तार केला कोकणात मोठया संख्येने जलदुर्गाची बांधणी करुन आपल्याकडे राजकिय सत्तासुत्रे कायम राहतील याची दक्षता घेतली. उघडया मैदानावर मोगलांसोबत लढणे अवघड आहे. हे जाणून त्यांनी तशी युध्दनिती अवलंबिली. पाश्चिमात्यांचे सामर्थ्य पाण्यात आहे ओळखुन शिवाजी राजांनी परकिय शत्रुपासुन पश्चिम किनारा सुरक्षित ठेवण्यासाठी अनेक जलदुर्ग बांधले तसेच जुन्या सागरी किल्ल्यांची दुरुस्ती केली. गोव्याचे पोर्तुगीज वेगुर्ल्याचे डच, राजापूरचे इंग्रज याच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सिंधुदुर्ग सारखा भरभक्कम जलदुर्ग मालवण जवळ समुद्राच्या पोटात उभारला. जंजिऱ्याच्या सिद्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पद्मदुर्ग किल्ला बांधला विजयदुर्ग, रत्नगिरी, अलिबाग सुवर्णदुर्ग अशा कितीतरी सागरी किल्यांना राजकिय दृष्टया शिवकाळात महत्व प्राप्त झाले. अलिबाग व मालवण येथील जलदुर्ग शिवाजी राजांच्या आरमाराचे प्रमुख केंद्र होते. जंजिऱ्याच्या सिद्दीवर राजकिय दबाव ठेवण्याच्या दृष्टीने शिवाजी राजांनी मुंबईच्या दक्षिणेस १८ कि.मी. व जंजिऱ्याच्या उत्तरेस ४८ कि.मी. अंतरावर असणाऱ्या खांदेरी बेटावर तटबंदी उभारण्यास (१६७६) सुरुवात केली.

शिवाजी राज्यानी पाश्चात्यांशी केव्हा तरी संघर्ष होणार हे जाणून आरमारी समार्थ्य वाढविण्याचा त्यांनी योजना पूर्वक प्रयत्न केला आरमार व जलदुर्गा संबंधी आज्ञापत्रात विवेचन केले आहे.

## कर्नाटकातील किल्ल्यांचे राजकिय महत्व :-

आगऱ्याहून सुखरुप परत आल्यानंतर मोगली आक्रमणाचा संभाव्य धोका शिवाजी राजांनी ओळखला होता. म्हणुन भविष्यातील संकटावर मात करण्यासाठी महाराजांनी राज्याभिषेकानंतर कर्नाटक मोहीम हाती घेतली. या मोहीमेत त्यांनी वेलोर, कोप्पल,बेलडी आणि जिंजी हे प्रमुख किल्ले जिंकून घेतले. आपल्या ताब्यातील कर्नाटकामधील प्रदेशाचे मोगल, आदीलशहा, कुतूबशहा, या सत्तापासुन रक्षण व्हावे. म्हणून या प्रदेशातील अनेक किल्यांची दुरुस्ती केली व काहींची नव्याने बांधणी करुन त्यांनी किल्ल्यांची साखळी निर्माण केली. जिंजीचा किल्ला ज्यांच्या ताब्यात त्यांच्या ताब्यात मद्रास कर्नाटकचा प्रदेश इतका महत्वाचा जिंजी किल्ला होता. मराठा स्वातंत्र्ययुध्दात मोगलांच्या विशाल सेनेला त्रस्त करण्यात कर्नाटकातील किल्ल्यामुळे मराठे कमालीचे यशस्वी ठरले व मराठयाचे राज्य जिवंत राहीले.

## शिवकालीन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व :-

शिवकाळात लिहीलेल्या 'शिवभारत' ग्रंथात किल्यांना राजकिय क्षेत्रात असलेले महत्व विशद केले आहे. म्हणूनच शिवाजी राजांनी प्रतिवर्षी किल्यांच्या डागडूजी व बांधणीसाठी मोठी रक्कम खर्च करीत असत. म्हणूनच किल्यांमुळे राज्याला बळकटी आली. औरंगजेबासारख्या बलाढय शत्रुचे आयुष्य संपले ते किल्यांमुळेच राज्याचे संरक्षण करणे,जनतेच्या अन्नाची व्यवस्था करणे शत्रुचे नामोहरण करणे किल्यामुळचे शक्य झाले. शिवाजी राज्यांच्या ताब्यातील ३६० किल्ले, एककिल्ला वर्षभर जरी लढविला तरी औरंगजेबासारख्या शत्रुला ३६० वर्ष लागतील असा विश्वास शिवाजी राजांचा होता. मराठा स्वातंत्र्ययुध्दा हा विश्वास स्वराज्यातील किल्ल्यांनी सार्थ ठरविला.

आपल्या प्रदेशातील डोंगर, दऱ्या गडकोट हि बलस्थाने आहेत यांची महाराजांना खात्री होती म्हणूनच कितीही मोठा श्शत्रु या पदेशात आला तरी त्याचा नाश अटळ आहे असा विश्वास महाराजांना वाटत होता.

राज्यातील गडकोटाचे राजकिय महत्व सांगतांना रामचंद्र अमात्य 'आज्ञापत्र'या ग्रंथात लिहीतात,''हे राज्य तर तीर्थरुप थोरले कैलासवासी स्वामीनी गडारुनच निर्माण केले. जो जो देश स्वशासन वश न होय त्या त्या देशी स्थलविशेष पाडून गट बांधिले. त्यावरुन आक्रमणे करीत करीत सालेरी अहिवंतापासुन कावेरी तीर पर्यंत निष्कटंक राज्य संपादिले. औरंगजेबासारखा महाशत्रु चालुन येवून विजापूर भागा नगासारखी महासंस्थाने आक्रमिली तीस बत्तीस वर्षापर्यंत या राज्याशी अतिश्रम केला त्यांचे प्रयत्नास असाध्य काम होते. परंतु राज्यात किल्ले होते म्हणुन अवशिष्ठ तरी राज्य राहीले.''

शिवकालीन किल्ल्यांचे राजकिय व ऐतिहासीक महत्व विशद करतांना रियासतकार सरदेसाई म्हणतात या बहूमोल दुर्गमालीकेने शिवाजी महाराजांनी आपले राज्य बंदिस्त केले महाराजांचे बहुतेक आचट कृत्ये हया किल्ल्यांच्या योगाने तडीस गेली. नाना ठिकाणची लुट सुरक्षिततपणे किल्ल्यांवर आणून ठेवता आली सुरत व खानदेश येथील लुट रायगडी आणतांना बागलान नासिक या प्रांतातील किल्ल्यांचा त्यास अतिशय उपयोग झाला. शिवाजी राजांनी मिळविलेला बहुतेक पैसा किल्ल्यासाठीच खर्च केला अनेक आणिबाणीच्या प्रसंगी महाराजांना त्यातुन निभावून जाण्यास हेच किल्ले त्यास उपयोगी पडेल. कित्येक किल्ले स्वरंक्षणाच्या सोयीचे तर कित्येक अचानक शत्रुवर छापा घालुन त्यांचा पाडाव करण्याच्या सोयीचे असे नावाजलेले असुन त्यांच्याच योगाने मराठयांच्या तत्कालीन पराक्रमास एक प्रकारची विलक्षण धार प्राप्त झाली आहे. रायगड किल्यावर आपली राजधानी केली, कर्नाटक प्रांत जिंकुन जिंजी किल्ला ताब्यात ठेवण्यातत्यांनी अतिशय श्रम व खटपट केली तोच जिंजी किल्याच भावी संकट प्रसंगी मराठयांचे राज्य वाचविण्यास समर्थ ठरला.

राजचंद्रपंताच्या आज्ञापत्रातील किल्यांच्या संदर्भात आलेल्या उल्लेखावरुन १७ व्या शतकात गडकोटास राजकिय दृष्टया किती महत्व होते हे स्पष्ट होते. शिवकालिन किल्ले म्हणजे आपले

'प्राणसंरक्षण' हि भावना सर्वत्र होती.पुढे येणाऱ्या प्रत्येक संकटप्रसंगी या किल्यांनीच शिवाजी राजांना तारले संपुर्ण हिंदुस्थानच्या इतिहासात किल्यांच्या आश्रयाने किल्ल्यांचे वैभव वाढवित परकिय सत्तेला हतबल करणारा शिवाजी राजा हा एक प्रमुख राजा होता. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर या किल्यानीच स्वराज्य संरक्षिले व औरंगजेबाला निष्प्रभ केले.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. दिवेकर स.म.-(सपा') कवि परमानंद कृत, शिवभारत (१९२७)
२. केळकर न.चि.(प्रका) - शिवचरित्र निबंधावली (१९२९)
३. कर्वे चि.ग. - महाराष्ट्र परिचय खंड पहिला १९५४
४. जोगळेकर स.आ. - सहयांद्री १९५२
५. कुळकर्णी अ.रा. (सपा')मराठयांचा इतिहास खंड पहिला १९८४
६. देशपांडे प्र. न. राजगड दर्शन १९८१
७. देशपांडे प्र.न. (सपा') मराठयांच्या इतिहासाची साधने खंड पहिला २००२
८. चिटणीस के. एन. - मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग-१ - १९८५
९. जोशी शं. ना. (सपा') हुकूमतपन्हा रामचंद्र अमात्य यांचे आज्ञापत्रव राजनिती १९६०
१०. पवार जयसिंगराव - मराठी सत्तेचा उदय १९८८.